| | |
|---|---|
| MHJN020005722018 | नि.दि.वा.क्र.३१/२०१८<br>सुमितकुमार व ई–वि–लक्ष्मण व ईतर |

## निशाणी क्र.५३ वरील आदेश
## (दि.०६.१०.२०२५ रोजी पारीत)

. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.१–लक्ष्मण पि.सारजाजी करंडे यांचे कायदेशीर वारसांना अभिलेखावर घेण्यासाठी आदेश २२ नियम ४ सह कलम १५१,दिवाणी प्रक्रिया संहिता अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

### वादींचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–

२. वादींनी प्रस्तुतचा दावा ताबा आणि कायम मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला असून तो न्यायप्रविष्ठ आहे. प्रस्तुतचा दावा प्रलंबीत असतना प्रतिवादी क्र.१–लक्ष्मण पि.सारजाजी करंडे यांचे दि.२२.०६.२०२५ रोजी निधन झालेले असून त्यांच्या वारसांना अभिलेखात समाविष्ट करणे गरजेचे आहे. याबाबत प्रतिवादी यांनी दि.०१.०७.२०२५ रोजी पुरशिष दाखल करुन सूचित केल्यामुळे मयताच्या वारसांना पटलावर घेण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादी पुढीलप्रमाणे मयताच्या वारसांना अभिलेखामध्ये समाविष्ट करुन खालीलप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती करु ईच्छीत आहेत–

| | |
|---|---|
| १(अ) | प्रतिक्षा पि.लक्ष्मण करंडे, वय २९ वर्षे,धंदा–घरकाम. |
| १(ब) | अन्नपूर्णा भ्र.सारजाजी करंडे, वय ९० वर्षे,धंदा–घरकाम. |
| | दोघेही रा.सिंधी बाजार,कडबी मंडी,जालना,ता.जि.जालना |

३. वादींचे पुढे कथन की,सदर दाव्याचा न्यायनिर्णय गुणवत्तेवर होण्याच्या दृष्टीने मयत लक्ष्मण पि.सारजाजी करंडे यांचे व्यतिरीक्त ईतर कोणीही वारस नाहीत. त्यामुळे त्यांना अभिलेखावर घेण्यासाठी परवानगी देणे न्याय व योग्य होईल.

४. प्रतिवादी क्र.४ यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे सादर केले. त्यांचे कथन की,प्रस्तुत अर्ज कायदयानुसार चालविण्यायोग्य नाही. तसेच प्रतिवादी क्र.१(ब) यांना पूर्वीच अभिलेखावर घेण्यात आलेले आहे आणि तिचा मृत्यू झालेला आहे. शिवाय कायदेशीर वारस आणि प्रतिवादी क्र.१(अ) ही तिच्या पतीच्या घरी पुणे येथे राहते,परंतु अर्जामध्ये पत्ता चुकीचा दिला गेला आहे. म्हणून अर्ज नाकारण्यात यावा आणि तो रद्द करावा.

५. अभिलेखावरील दस्तऐवज आणि लेखीजबाबाचे अवलोकन केले.

६. वादी आणि प्रतिवादी क्र.४ यांचा मौखीक युक्तीवाद ऐकला.

७. वादींनी वाद मिळकत कडबी मंडी,सिंधी बाजार,जालना येथील न. भू.क्र.६१६ एकुण क्षेत्र.१०९.४ चौ.मी.पैकी ३५चौ.मी. जे की,नि.दि.वा.क्र.४१५

/२०११ मध्ये नि.क्र.८३ वरील नकाशामध्ये दर्शविल्या–प्रमाणे सदर वाद मिळकतीचा ताबा आणि कायम मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादींच्या नुसार वाद मिळकतीचे मालक व ताबेदार कोण आहेत आणि मनाई हुकूम आदेश मिळण्यास वादी पात्र आहेत का हा साक्षीपुराव्याचा भाग आहे. परंतु आजच्या टप्प्यावर प्रतिवादी क्र.१–लक्ष्मण पि.सारजाजी करंडे हे दि. २२.०६.२०२५ रोजी मयत झालेले असल्यामुळे त्यांच्या वारसांना अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने अंतिम न्यायनिर्णयावेळी काही तांत्रीक त्रृटी राहू नये आणि प्रस्तुतचा दावा कायदेशीर गुणदोषावर निकाली काढण्याच्या दुष्टीने प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता वादींचा नि.क्र.५३ वरील अर्ज मंजूर करण्यास पात्र ठरतो. करीता पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो–

## आदेश

| | |
|---|---|
| १ | वादींचा नि.क्र.५३ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २ | वादींना प्रतिवादी क्र.१–लक्ष्मण पि.सारजाजी करंडे यांचे कायदेशीर वारसांना अभिलेखात समाविष्ट करण्याची परवानगी मंजूर करण्यात येते. |
| ३ | वादींनी प्रतिवादी क्र.१–लक्ष्मण पि.सारजाजी करंडे यांच्या वारसांना विहित मुदतीत अभिलेखामध्ये समाविष्ट करण्यात येऊन सुधारित दाव्याची प्रत दाखल करावी. |

| | |
|---|---|
| ४ | वादी आणि प्रतिवादी यांना निर्देशित करण्यात येते की,त्यांनी प्रस्तुत प्रकरण जुने असल्यामुळे लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे. |

ASHVINI PRAVIN DIWAN
Digitally signed by ASHVINI PRAVIN DIWAN
Date: 2025.10.08 12:12:14 +0530

(अश्वीनी प्र. दिवाण)

दि.०६.१०.२०२५ दिवाणी न्यायाधीश(व.स्तर)

जालना

**प्रमाणपत्र**

निवेदन करण्यात येते की,पी.डी.एफ.फाईल मधील शब्द न् शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :–शि.दि.देशमुख

न्यायालयाचे नाव :–दिवाणी न्यायाधीश(व.स्तर),जालना

पी.डी.एफ.दिनांक :–दि.०७.१०.२०२५

लघुलेखक(म.)